डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि तंत्र विद्यालय, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृतंविला/रोपवाटिका/112/२०२० दिनांकः— 18 JUN 2020

## —: जाहीर नोटीस :—

कृषि तंत्र विद्यालय,लांजा यांजकडून या विदयालयाच्या रोपवाटिकेवरील खालील नमूद केलेली शेतीविषयक कामे ठेका पदधतीने करण्यासाठी दरपत्रके सोबतच्या प्रपत्रामध्ये मागविणेत येत आहेत. दरपत्रके दि. २९/६/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्वीकारली जातील.

| अ. क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | कालावधी | अंदाजे लागणारे मजुर युनिट |
|---|---|---|---|---|
| ०१ | रोपवाटिका | हापूस आंबा बडस्टीक काढणे, आंबा नारळ झाडांना खते देण्यासाठी रिंगा करणे, खते घालणे, रिंगा बुजवणे, प्रक्षेत्रावर दिवसा व रात्री पहारा करणे, कलमा रोपांना पाणी घालणे, कलमा रोपांवरील फूट काढणे, कलमा रोपांतील तण काढणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १ जुलै ते ३१ जुलै | ११५ |
| ०२ | रोपवाटिका | आंबा बागेतील साफसफाई करणे, प्रक्षेत्रावर दिवसा व रात्री पहारा करणे, काजू मातृवृक्ष बागेची साफसफाई करणे, मातृवृक्ष बागेतील गॅप भरणे, कलमा रोपांना पाणी घालणे, कलमा रोपांवरील फूट काढणे, कलमा रोपांतील तण काढणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट | ११५ |
| ०३ | रोपवाटिका | कलमा रोपांना पाणी घालणे, कलमा रोपांवरील फूट काढणे, कुंपण दुरूस्ती करणे, कलमा रोपांतील तण काढणे, प्रक्षेत्रावर दिवसा व रात्री पहारा करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर | ११५ |

कामासंबंधी अटी व शर्ती सोबत दिलेल्या आहेत.

अधिक्षक,
कृषि तंत्र विद्यालय,
लांजा जि. रत्नागिरी

प्रत प्रसिध्दीसाठी रवानाः—

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली
/— सदर पत्र विदयापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

२. कार्यालय नोटिस बोर्ड

**ठेका पध्दतीने कामे करणे संबंधिच्या या कार्यालयाच्या अटी/शर्ती**

१. कामाची वेळ सकाळी ८:०० ते १२:०० आणि दुपारी २:१५ ते ५:४५ अशी राहील.

२. ज्या दिवशी ठेकेदार गैरहजर राहाणार त्यावेळी पुर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

३. प्रक्षेत्रावरील कामे संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या सूचनेनुसार करावयाची आहेत.

४. कामाची गरज संपल्यावर कोणत्याही प्रकारची लेखी पूर्वसूचना न देता ठेका पध्दत रद्द केली जाईल

५. ठेकापध्दतीने काम केल्याने या कामाच्या आधारे कायम सेवेत घेण्यासाठी विद्यापीठाकडे अथवा शासनाकडे हक्क सांगता येणार नाही

६. ठेका मंजुरीनंतर अटी व शर्ती मान्य असल्याचा करार लिहून द्यावा लागेल

७. ठेका पध्दतीने नेमलेल्या मजूरांच्या कामाच्या सेवा जेष्ठता नोंदी ठेवण्यात येणार नसून त्यांच्या काम सेवेबाबतची कोणतीही बांधीलकी विद्यापीठ प्रशासनावर अथवा शासनावर राहणार नाही

८. ठेकापध्दतीने नेमलेल्या ठेकेदाराच्या कोणत्याही अटी व शर्ती स्विकारल्या जाणार नाहीत

९. सदर कालावधीत केलेल्या कामाचे बील प्रत्येक महिना पुर्ण झालेवर अदा करण्यात येईल

१०. प्रक्षेत्रावर काम करत असताना कोणत्याही कारणाने व कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास सदरील अपघात हे केंद्र जबाबदार राहाणार नाही

E- Divya G – Contractor case _ Jahir notice ropwatika